

## खेळाडू कोट्यातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी महत्त्वपूर्ण बैठक संपन्न.


e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 21/03/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 58 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com


# महिलांची इच्छाशक्ती प्रबळ असायला हवी - तृप्ती देसाई














➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

प्रत्येक महिलेची इच्छाशक्ती प्रबळ असायला हवी, इच्छाशक्ती प्रबळ असल्यावर संपूर्ण जग जर तुमच्या विरोधात गेले तरी विजय तुमचाच असतो हे मी अनेक आंदोलनातून दाखवून दिले आहे.असे महिलांना उद्देशून भूमाता ब्रिगेड च्या संस्थापक अध्यक्ष तृप्ती देसाई यांनी सांगितले. जागतिक महिला दिनानिमित्त शबनम न्यूज मीडिया ग्रुप या वृत्त संस्थेच्या वतीने आदर्श नारी पुरस्कार 2025 हा पुरस्कार सोहळा रविवारी 16 मार्च रोजी चिंचवड येथील सायन्स पार्क सभागृहात संपन्न झाला भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती ताई देसाई यांच्या शुभहस्ते समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना आदर्श नारी पुरस्कार प्रदान करण्यात आले. तृप्ती देसाई यांनी पुढे सांगितले. कि अनेक कर्तुत्वान महिला समाजात काम करत आहेत . ज्या महिलांचा संघर्ष मोठा आहे ज्या महिलांनी आपल्या कार्यक्षम कर्तुत्वाने नवलौकिक मिळविला आहे. अशा महिलांना आज शबनम न्यूज मीडिया ग्रुप वृत्तसंस्थेच्या वतीनेआदर्श नारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे.एखादी महिला पत्रकार काय काय करू शकते हे शबनम सय्यद यांनी दाखवून दिले आहे.पिंपरी चिंचवड मध्ये शबनम सय्यद यांनी आपली एक नवीन ओळख तयार केली आहे. समाजात काम करणाऱ्या महिलांना जर आपण शाबासकी ची थाप दिली, त्यांना पुरस्कार दिले तर या महिला पुढील काळात अनेक चांगले काम करतील या उद्देशाने शबनम सय्यद यांनी आज हा आदर्श नारी पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे. महिलांनी अडचणीच्या काळात डगमगून न जाता आपण जे चांगले काम करत आहोत ते सुरू ठेवायला पाहिजे कोणत्याही महिलेने कोणत्याही परिस्थितीत घाबरून न जाता हिमतीने पुढे जायला हवे. महिला अत्याचाराच्या घटना सध्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत अशा घटना होऊ नये यासाठी महिलांनी आवाज उठवायला हवा. महिलांनी कुठेही कमी पडता कामा नये अत्याचारच्या घटनेच्या विरोधात प्रत्येक महिलेने दुर्गेचे रूप धारण करावे. असे हि तृप्ती देसाई यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने करण्यात आली तसेच प्रमुख मान्यवरांचा सत्कार शबनम न्यूज मीडिया ग्रुपच्या संचालिका तथा कार्यक्रमाच्या आयोजक शबनम सय्यद यांच्या हस्ते करण्यात आले.तर कार्यक्रमाची प्रस्तावना गजाला सय्यद यांनी मांडली,या पुरस्कार सोहळ्यात चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, अध्यक्ष सरिता अरुण साने, आदी मान्यवर उपस्थित होते.

## शबनम सय्यद यांनी सामाजिक बांधिलकी जपली - अश्विनी जगताप (मा.आमदार)



आमदार अश्विनी जगताप यांनी सांगितले की शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार हा महिलांना त्यांच्या सामाजिक कामासाठी नवीन ऊर्जा देणार आहे. महिलांनी आपल्या कार्यक्षेत्रात आणखीन चांगले काम करावे यासाठी हा पुरस्कार महत्त्वाचा आहे. अशा कार्यक्रमातून शबनम सय्यद यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

## आदर्श नारी पुरस्कार हा महिलांसाठी प्रेरणादायी पुरस्कार - उषा माई ढोरे (मा.महापौर)



माजी महापौर उषा माई ढोरे यांनी सांगितले की शबनम सय्यद यांनी दाखवून दिले आहे की एक महिला पत्रकार किती काम करु शकते, त्या दरवर्षी समाजातील उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी आदर्श नारी पुरस्काराचे आयोजन करत असतात आदर्श नारी पुरस्कार हा महिलांसाठी प्रेरणादायी पुरस्कार आहे.

### ✻ पुरस्कार्थी ✻














विशेष सन्मान या पुरस्कार सोहळ्यात डॉ. तृप्ती रामाने - धनवटे (संचालक - आकांक्षा ऑर्गनायझेशन ),सौ.अनिताताई सुंदर कांबळे (संस्थापक अध्यक्षा : संविधान महिला मंडळ),सौ. संगीता ज्ञानेश्वर काळे (शिक्षिका ,सातारा),सौ. सुप्रिया महेश चांदगुडे (संस्थापिका - आधार महिला मंडळ),सौ. पुनम संतोष म्हस्के (सामाजिक कार्यकर्त्या),सौ.अश्विनी विशाल पवळ- सरोदे (आशा वर्कर ),सौ. प्रीती संजय मराठे (सामाजिक कार्यकर्त्या),सौ. सोनाली संदीप गाडे (सामाजिक कार्यकर्त्या),सौ. अश्विनी बाळासाहेब घारे (अध्यक्ष एकता प्रतिष्ठान डोणे, मावळ),श्रीमती. मालन बबनराव घुले (वारकरी कीर्तनकार), सौ. मीना चंद्रमणी जावळे (आम आदमी पक्ष शहराध्यक्ष पिंपरी चिंचवड),श्रीमती कमल उत्तम सोनजे (कवयित्री लेखिका) या आदर्श महिलांना आदर्श नारी पुरस्कार 2025 ने सन्मानित करण्यात आले.

तर पिंपरी चिंचवड शहरातील सामाजिक, शैक्षणिक , राजकीय व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने करण्यात आला. या मध्ये सौ.अंजू कोंडीराम सोनवणे (सामाजिक कार्यकर्त्या),सौ. शोभा संभाजी पगारे (सामाजिक कार्यकर्त्या),सौ. कविता एकनाथ खराडे (संस्थापक - जिव्हाळा महिला विकास प्रतिष्ठान),सौ.पुनम विनयकुमार विश्वकर्मा (उद्योजिका),सौ.सुप्रिया सुनिल सोलांकुरे (सामाजिक कार्यकर्त्या),सौ.सायली कुलकर्णी (महिला पत्रकार),श्रीमती कुसुम रामचंद्र दळवी (वृत्तपत्र विक्रेत्या),सौ अर्चना गजानन देशमुख (मेकअप आर्टिस्ट),सौ पुष्पा प्रदीप शेळके (राष्ट्रवादी शहर महिला संघटिका),सौ.माया सूर्यकांत मुळे (शिक्षिका) यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

तर उत्कृष्ट काम करणाऱ्या दहा महिला बचत गटांचा हि सन्मान करण्यात आलाया मध्ये सरस्वती महिला बचत गट, विघ्नहर्ता महिला बचत गट, राजमाता जिजाऊ महिला बचत गट,भिमाई महिला बचत गट, गृहलक्ष्मी महिला बचत गट, रिद्धी महिला बचत गट, सुवर्ण महिला बचत गट,श्रीमती धरूबाई महिला सोशल फाउंडेशन, वुमन पावर महिला बचत गट, रमाई महिला बचत गट या बचत गटांचा सन्मान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते संभाजी बारणे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्रसिंग वालिया,,संजय मराठे यांच्यासह शेकडो महिलांनी या कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या शेवटी आसिया इनामदार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक भाऊसाहेब कोकाटे यांनी केले.

**✻विशेष सन्मान ✻**













**✻बचत गट सन्मान✻**












दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत हे बातमी पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक शबनम रफीक सय्यद यांनी क्रांती मुद्रणालय, सर्वे नंबर १६/६८ विठ्ठल मंदिर जवळ,गुजर नगर,थेरगाव,पुणे- ३३ येथे छापून सर्वे नंबर ११/२,पडवळ नगर,थेरगाव,चिंचवड,पुणे -३३ येथून प्रकाशित केले आहे सदर बातमी पत्रातील मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय)
अधिक माहितीसाठी : ८९९९९४८९६८ कार्यकारी संपादक :सय्यद रफिक हुसेन, • RNI TC - MAHMAR51259 • Email : metrocity924@gmail.com www.metrocityvrutant.in

# तंत्रज्ञानामुळे मानसिक तणाव वाढला

## प्रा.डॉ.सुरेश मोनीः 'एमआयटी एडीटी'त सातव्या आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणेः तंत्रज्ञानाने सध्या भारतासह जगाला भुरळ घातली आहे. सध्या जगात प्रत्येक महिन्यात नवीन बदल घडतो आहे. बदलाचा हा वेग प्रचंड असून त्याच्याशी जुळवून घेताना लोकांची दमछाक होताना दिसत आहे. एआय सारख्या बदलत्या तंत्रज्ञानामुळे सातत्याने माहितीचा भडीमार मानवी मेंदूवर होत आहे. त्यामुळे, त्यातून काय घ्यावं? आणि काय सोडावं? आणि समोर येणाऱ्या मजकूराची विश्वासार्हता आणि सत्यता याबाबत साशंकता असल्याने परिणामी मानसिक तणावात वाढ होत आहे, असे मत बंगळुरू येथील नार्से मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे माजी संचालक प्रा. डॉ.सुरेश मोनी यांनी मांडले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर महाराज विश्व शांती डोम येथे 'इनोव्हेटिव्ह ग्लोबल टेक्नॉलॉजी ट्रेंड्स' या विषयावर आयोजित सातव्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. याप्रसंगी, अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.एकनाथ खेडकर, 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरु डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे आदी उपस्थित होते.



डॉ.खेडकर यावेळी म्हणाले की, पूर्वी पेटंट सादर करण्यात व त्याची नोंदणी होण्यावर चीन, अमेरिका आणि जर्मनी सारख्या राष्ट्रांचे एकतर्फी प्रभुत्व होते. परंतु, बदलत्या काळानुसार भारतीय संशोधकांच्या मेहनतीमुळे पेटंट नोंदणीत आता भारताने आपला दबदबा निर्माण केला आहे. यासह, चॅट जिपीटी, डीपसेक सारख्या तंत्रज्ञानामुळे मानवाचे वाचन कमी व्हायला नको, याची काळजी घ्यावयास हवी, असेही त्यांनी म्हटले.

यावेळी बोलताना प्रा.डॉ.सुनीता कराड म्हणाल्या, एमआयटी एडीटी विद्यापीठ दरवर्षी ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करते. यंदा या परिषदेचे सातवे वर्ष असून त्यामाध्यमातून आत्तापर्यंत ६०+ स्टार्टअप्स व ३००० हून अधिक विद्यार्थ्यांना रोजगार देण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. यंदा २० हून अधिक विषय घेवून विद्यापीठात वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळेला पुढील तीन दिवस ही परिषद पार पडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजेद्वारे सुरू झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.सुनीता कराड यांनी तर आभार डॉ.मोहित दुबे यांनी मानले. तर डॉ.स्नेहा वाघटकर व डॉ.स्वप्निल शिरसाठ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पसायदान द्वारा कार्यक्रमाची सांगता झाली.

### तंत्रज्ञानाच्या धोक्यांपासून सावध रहा- प्रा.डॉ.कराड

यावेळी अध्यक्षीय मनोगतात प्रा.डॉ. मंगेश कराड म्हणाले की, सध्या जगासमोर अनेक आव्हाने आहेत. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाने भौगोलिकदृष्टा अनेक गोष्टींमध्ये मोठा बदल घडविला आहे. त्यामुळे, जागतिक पातळीवरील या आव्हानांवर विचारमंथन व्हावं यासाठी दरवर्षी ही परिषद भरवली जाते. दिवसेंदिवस बदलणाऱ्या एआय सारख्या तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग करत असताना त्यातील डिफेक सारख्या धोक्यांपासूनही आपण सावध रहायला हवे, असा इशाराही त्यांनी दिला.

# मसाप प्रकाशित करणार शहरातील वैभव स्थळांचा काव्यसंग्रह

## दहा एप्रिल पर्यंत काव्यरचना पाठवण्याचे मसापचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे पाच गावांचे एकत्रीकरण करून पिंपरी चिंचवड नगर पालिकेची स्थापना करण्यात आली. गाव खेड्यांचे शहर, शहराचे महानगर, औद्योगिक नगरी, कामगार नगरी आणि आता आंतरराष्ट्रीय दर्जाचे मेट्रो शहर असा नावलौकिक या शहराला प्राप्त झाला आहे. पिंपरी चिंचवड शहराचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्व वाढत असताना शहराच्या भौगोलिक कक्षा देखील वाढत गेल्या. यात पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात भर घालणाऱ्या अनेक वैभव स्थळांचा समावेश आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने या विविध वैभव स्थळांचे वर्णन करणाऱ्या काव्यरचना एकत्र करून त्याचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे.

यामध्ये शहरातील सर्वसामान्य नागरिकांपासून लेखक, कवी, रसिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष राजन लाखे व हा नियोजित काव्यसंग्रह प्रकाशित करण्याची जबाबदारी घेतलेले समन्वयक संभाजी बारणे यांनी केले आहे.

यासाठी दहा एप्रिल २०२५ पर्यंत आपल्या काव्यरचना महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा, द्वारा राजन लाखे, ३, लक्ष्मी कॉम्प्लेक्स, हनुमान स्वीट समोर, चिंचवड पुणे ३३ किंवा संभाजी बारणे (फोन - 9822314810) यांच्याकडे जमा कराव्यात. यासाठी निवड समितीने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे. कवीने स्वतःचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक हे शीर्षकाच्या वर उजव्या भागात लिहावे. कविता ३० ओळींपेक्षा मोठी नसावी. गझल, अभंग, गवळण, पोवाडा आदी. प्रकारच्या कवितांचा समावेश करण्यात येईल. कवितांमध्ये श्री महासाधू मोरया गोसावी, देऊळ मळा, मोरया गोसावी मंदिर, इंद्रायणी, पवना आणि मुळा नदी, राजा भोज ची भोजापुर नगरी, भोसरी गावचे कुस्ती क्षेत्रातील वैभव, क्रांतिवीर चाफेकर स्मारक, शहराची औद्योगिक नगरी म्हणून ओळख मिळवून देणारी एच. ए. कंपनी, हापकिन महामंडळ, टाटा मोटर्स, बजाज ऑटो कंपनी, सँडविक, एसकेएफ सारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्या, भक्ती शक्ती समूह शिल्प, शिवसृष्टी भोसरी, पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, बर्ड व्हॅली उद्यान, विविध सांस्कृतिक महोत्सव, क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विविध संस्थांची ओळख करून देणाऱ्या कविता, उद्योग नगरी ओळख, साहित्य नगरी ओळख, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, अप्पू घर, गुलाब पुष्प व फुलपाखरू, सर्प उद्यान, डायनासोर अशी आकर्षक उद्याने, शहरातील विविध मंदिरे, थोर महापुरुषांची स्मारके, मेट्रो, बोट क्लब वेगराव, बहिणाबाई संग्रहालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, दुर्गा देवी टेकडी, गणेश तलाव, सांस्कृतिक केंद्रे, नाट्य केंद्रे, कुस्तीगीर, पिंपरी मार्केट, बास्केट ब्रिज या पिंपरी चिंचवडचे वैभव वाढवणाऱ्या विषयांवरती तसेच कवींना माहित असलेल्या इतर वैभव स्थळांची महती सांगणाऱ्या कविता १० एप्रिल पर्यंत जमा करावयात असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सल्लागार सदस्य व या नियोजित काव्यसंग्रहाचे प्रकाशक संभाजी बारणे यांनी केले आहे.

# खेळाडू कोट्यातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी महत्त्वपूर्ण बैठक संपन्न.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवारी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्त मामा भरणे यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकाराने खेळाडू कोट्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती धोरण व इतर महत्त्वाच्या विषयांवर बैठक पार पडली. यामध्ये बैठकीतील महत्त्वाचे मुद्देः , शासन निर्णय (2016): खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रांत ५% आरक्षणाचा लाभ

,शासन निर्णय (2019): पदोन्नती प्रक्रियेसाठी मार्गदर्शक तत्त्वे लागू , खेळाडू आरक्षणातून नियुक्त कर्मचाऱ्यांना नियमित शासकीय सेवकांप्रमाणेच नियम लागू , राष्ट्रीय/राज्यस्तरीय खेळाडूंना प्राविण्यानुसार पदोन्नतीच्या संधी , महानगरपालिका आणि नगरपालिका स्तरावर सेवाप्रवेश व पदोन्नती प्रक्रिया सुकर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही

अशा या महत्त्वपूर्ण चर्चेमुळे खेळाडू कोट्यातील कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी ठोस निर्णय होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. खेळाडूंच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा मोठा टप्पा ठरणार आहे!

या बैठकीला आमदार उमा खापरे, आमदार बापूसाहेब पठारे पवार, तसेच क्रीडा विभागाचे अवर सचिव अनिल डिग्रीकर, सुधीर मोरे, संजय सबनीस आदी मान्यवर उपस्थित होते.

# मोशी आणि खेड बंद टोल नाका काढण्यात यावा

## अभय भोर अध्यक्ष फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन यांची मागणी



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे पिंपरी वरून चाकण खेड येथे जाताना मोशी येथे बंद टोलनाका आहे त्यामुळे वाहनांना अडथळा निर्माण होऊन चाकण ला जाणाऱ्या जड वाहनांना आणि उद्योजक कर्मचाऱ्यांना अजून विलंब होतो पुना नाशिक रोडवर मोशी येथे असलेला टोलनाका कित्येक दिवसापासून बंद आहे परंतु आधीच चाकणला वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणात आहे त्यात मोशी येथे बंद टोल नाक्यामुळे अनेकदा वाहनांची कोंडी होताना दिसते शासनाने हा बंद टोल नाका त्वरित काढावा जेणेकरून पुण्याहून चाकणला जाणाऱ्या वाहनांना विनाअडथळा प्रवास करता येणे शक्य आहे आणि लागणारा वेळ वाचवता येईल या टोलनाक्याचा काहीच उपयोग नसून महामार्गात तो एक अडथळाच आहे औद्योगिक क्षेत्रातील अनेक मोठे जॉब घेऊन जाणारे ट्रक सुद्धा जाण्यास कधीतरी अडथळा निर्माण होतो अनेकदा टोल नाका जुना झाल्यामुळे त्याचे काही अवशेष हे गाड्यांवर सुद्धा पडतात त्यामुळे रहदारीतील हा अडथळा काढण्याची मागणी फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी आज प्रसिद्धी पत्रद्वारे केली.

# पिंपरी-चिंचवडसाठी महावितरणचे स्वतंत्र मंडल कार्यालय स्थापन करा - तुषार हिंगे

## माजी उपमहापौर तुषार हिंगे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने वाढत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे मोठे मोठे गृहप्रकल्प उभे राहत आहे. शहरातील औद्योगिक, रहिवाशी आणि व्यावसायिक वीज ग्राहकांची संख्या 30 लाखांहून अधिक झाली आहे. शहरातील नागरिकांना वारंवार उद्भवणाऱ्या वीजेसंदर्भातील समस्या तातडीने सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरासाठी महावितरण कंपनीचे स्वतंत्र मंडल कार्यालय स्थापन करण्यास यावे, अशी मागणी माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी केली आहे. यासंदर्भात यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे.



तुषार हिंगे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापन होऊन 42 वर्षे झाली आहेत. शहरातील सुखसोई लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड शहरात राहण्यास मोठी पसंती दिली जात आहे. त्यामुळे शहर चारी बाजूने झपाट्याने वाढत आहे. शहरात गगनचुंबी मोठे गृहप्रकल्प उभे झाले आहेत.

शहरात महावितरण कंपनीचे पिंपरी आणि भोसरी असे दोन विभाग कार्यरत आहेत. शहरातील औद्योगिक, रहिवाशी, व्यावसायिक अशा वीज ग्राहकांची संख्या 30 लाखांहून अधिक झाली आहे. परिणामी, शहरात वीजेसंदर्भातील अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यावर तातडीने उपाययोजना केल्या जात नसल्याने वीज ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. शहरातील औद्योगिक पट्ट्यातही वारंवार वीज खंडित होत असल्याने उद्योजकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. पावसाळ्यात या प्रकारच्या समस्येत आणखी भर पडते.

शहरातील नागरिकांना वारंवार उद्भवणाऱ्या वीजेसंदर्भातील समस्यांवर तातडीने तोडगा काढण्यासाठी पिंपरी-चिंचवड रहिवाशांसाठी महावितरण कंपनीचे स्वतंत्र मंडल कार्यालय स्थापन करण्यात यावे. जेणेकरून शहरातील नागरिकांना चांगली आणि दर्जेदार वीजपुरवठा सेवा उपलब्ध होईल. महावितरण कंपनीच्या स्वतंत्र कार्यप्रणालीमुळे नागरिकांच्या समस्येचे निराकरण होईल. येणाऱ्या काळात शहराच्या वाढत्या विकासासाठी हे कार्यालय अत्यावश्यक आहे, असे तुषार हिंगे यांनी निवेदनात म्हटले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात 181 चौरस किलोमीटर क्षेत्रफळात विस्तारले आहे. शहरात हजारो मोठ मोठे गृहप्रकल्प निर्माण झाले आहेत. अनेक गृहप्रकल्प तयार होत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात सध्या तीस लाखांहून अधिक वीज ग्राहक आहेत. शहरातील वीज खंडित होणे व इतर समस्या तातडीने सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरासाठी महावितरणचे स्वतंत्र मंडल कार्यालय स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

# मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वेचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी रेल्वेमंत्री सकारात्मक

## आठ दिवसात अधिकाऱ्यांसोबत बैठक; रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची ग्वाही

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - पुणे ते लोणावळा दरम्यानची तिसरी आणि चौथी मार्गिका करण्यासंदर्भात लवकरच राज्य सरकार सोबत बैठक घेतली जाईल. लोणावळावरून पुण्याला जाणारी दुपारी दीड वाजताची लोकल पुन्हा सुरू करण्याबाबत जनरल मॅनेजरला निर्देश दिले जातील. अमृत भारत योजनेत कर्जत रेल्वे स्थानकाचा समावेश केला जाईल. मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वेच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आठ दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिले आहे. त्यामुळे प्रलंबित प्रश्नांना गती मिळेल असा विश्वास खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला.अर्थसंकल्पीय अधिवेशनात रेल्वे विभागाच्या चर्चेत खासदार बारणे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील विविध प्रश्न मांडले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार बारणे यांना दालनात भेटण्यासाठी बोलविले. मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न समजावून घेतले. या प्रश्नांबाबत अधिवेशना दरम्यान अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीची माहिती देताना खासदार बारणे म्हणाले, पुणे ते लोणावळा दरम्यानची तिसरी आणि चौथी मार्गिका करण्यासंदर्भात रेल्वेमंत्री वैष्णव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली आहे. ही मार्गिका करण्याबाबत राज्य सरकार सोबत बैठक घेण्याचे नियोजन करण्यासंदर्भात चर्चा केली. ही मार्गिका झाल्यास प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. पनवेल येथे रेल्वेचे जंक्शन होत आहे. या जंक्शनला आताच मेट्रो जोडावी. जेणेकरून नागरिकांना मोठा फायदा होईल. कर्जतपासून लोणावळा पर्यंत नवीन मार्गिका तयार करावी. घाट परिसर कमी करावा.

मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, आकुर्डी, लोणावळा, तळेगाव दाभाडे, पनवेल, नेरळ रेल्वे स्थानकाचा अमृत भारत योजनेत कायापालट होत आहे. या योजनेत कर्जत रेल्वे स्थानकाचा समावेश करावा. त्याचा डीपीआर तयार करावा, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली. त्यावर पुढील वर्षी कर्जतचा समावेश केला जाईल अशी ग्वाही मंत्री वैष्णव यांनी दिली. ओव्हर ब्रिज च्या कामाला गती द्यावी. सिडकोने बनविलेल्या रेल्वे स्थानकावर सुविधांचा अभाव आहे. रेल्वे विभागाने सिडकोशी चर्चा करून सुविधा निर्माण कराव्यात, अशा विविध मागण्या केल्या. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत अधिवेशना दरम्यान अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन मंत्री वैष्णव यांनी दिले.



# महानगरपालिकेच्या वतीने भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदी झालेल्या निवडीबद्दल शहरातील चिंतामण बुरसे यांचा सन्मान..

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी,- पिंपरी चिंचवड शहरातील देशसेवेत सहभागी होणा-या युवकांमुळे शहराच्या लौकिकात भर पडली असून अशा युवकांचा अभिमान वाटत असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केले.



देशसेवेसाठी लहानपणापासून भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगत वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड झालेल्या पिंपळे गुरव येथील चिंतामण विष्णू बुरसे यांचा महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, चिंतामण बुरसे यांचे वडील विष्णू बुरसे,आई स्वाती बुरसे, विद्युत विभागातील प्रशांत जोशी हे उपस्थित होते.

चिंतामणला आठवीत असल्यापासून भारतीय सैन्याचे पोस्टर्स पाहून भारतीय सैन्यात भरती होण्याची आवड निर्माण झाली. तेच ध्येय मनाशी बांधून त्याने सैन्यात भारती होण्याचे सातत्याने प्रयत्न केले. एनडीए येथे निवड होण्यासाठी तीन वेळेस लेखी परीक्षा दिली परंतु मुलाखतीमध्ये निवड झाली नाही अशा परिस्थितीतून स्वत:चा आत्मविश्वास ढळू न देता चिंतामणने पुन्हा जोमाने अभ्यास करत एनसीसी कोट्यातून परीक्षा दिली. त्यामध्ये त्याची लेफ्टनंट पदी निवड झाली.

चेन्नई येथे ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी येथे त्यांनी तीन महिन्यांचे खडतर प्रशिक्षण देखील पूर्ण केले आहे. लवकरच ते ग्वाल्हेर येथे भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट म्हणून ते रुजू होणार आहे.

**पाल्यांच्या आयुष्यात पालकांची भूमिका महत्वाची...**

प्रत्येक पाल्यांच्या आयुष्यात पालकांची भूमिका महत्वाची असते. लेफ्टनंट पदी निवड झालेल्या चिंतामण यांचे वडील विष्णू बुरसे हे पुण्यातील एम. एम. कार्पोरेशन येथे लेखापाल म्हणून कार्यरत आहेत. तर आई स्वाती बुरसे या पिंपळे गुरव येथे खाजगी क्लासेस चालवतात. तरी देखील त्यांनी कायम चिंतामणला त्यांच्या आवडीनुसार शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. भरतीमधील अपयशानंतर त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. आपल्या मुलांना डॉक्टर व इंजिनीअर बनविण्याच्या मागे नं लागता लहानपणापासून आपल्या मुलाला त्यांनी देशसेवा करण्यासाठी सैन्यात भरती होण्याचे स्वप्न दाखवले म्हणून चिंतामण हे मोठे यश मिळवू शकला.

# दिवंगत माजी खासदार गजानन बाबर यांचा शहरात अर्धाकृती पुतळा उभारा

## शिवसेनेच्या विजय गुप्तांची महापालिका आयुक्तांकडे मागणी...

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी संयुक्त शिवसेनेचे दिवंगत माजी खासदार गजानन बाबर याचं अफाट कार्य पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना परिचितच आहे. गजानन बाबर यांना एक अभ्यासू , लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जायचे. त्याचं शहराच्या जडणघडणीत मोठ योगदान आहे. स्व. गजानन बाबर यांचा काळभोरनगर अथवा संभाजीनगर परिसरात अर्धाकृती पुतळा उभारण्यात यावा, अथवा त्यासाठी जागा उपलब्ध करावी, अशी मागणी शिवसेना पिंपरी विधानसभा समन्वयक विजय गुप्ता यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, औद्योगिक नगरी पिंपरी चिंचवड शहरात एकेकाळी सोन्याचा धूर निघत होता. एमआयडीसीत काम करण्यासाठी राज्यातून मोठा कामगार वर्ग इथे लोटला होता. काबाडकष्ट करून अनेक कामगारांनी इथ स्वतःच घर बांधल. पुढे जाऊन त्यांच्यापुढे मोठ्या समस्या निर्माण झाल्या. त्या समस्या सोडविण्यासाठी गजानन बाबर यांनी लोकचळवळ उभी केली. त्यातून शिवसेनेचा जन्म झाला. नागरिकांच्या पाठींब्यामुळे पुढे जाऊन ते काळभोरनगर प्रभागातून तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले.

त्यानंतर हवेली तालुक्यातून ते दोन वेळा आमदार तर, मावळ मतदार संघातून ते शिवसेनेचे पहिले खासदार म्हणून निवडून आले. नागरिकांना स्वतःचा हक्क मिळवून देण्यासाठी ते अखेरच्या श्वासापर्यंत झटत राहिले. भविष्यात त्यांचे विचार पुढील पिढीला देखील मार्गदर्शक व्हावेत, यासाठी महापालिकेने स्व. गजानन बाबर यांचा काळभोरनगर किंवा संभाजीनगर परिसरात अर्धाकृती पुतळा उभारण्यात यावा, अथवा त्यासाठी जागा उपलब्ध करावी, असे या निवेदनात गुप्ता यांनी म्हटले आहे.

# 'भक्ती उत्सवा'त मिळाली ईश्वराची अनुभूती - हभप प्रशांत महाराज मोरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे भक्ती उत्सवात अभंग, भारुड, भजनांचे श्रवण करताना साक्षात ईश्वरच समोर आल्याची अनुभूती मिळाली. परंपरा जपण्यासाठी, सामाजिक स्थैर्य, सुसंस्कृत समाजासाठी लोकोत्सवासारखे कार्यक्रम झाले पाहिजेत. ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन संत तुकाराम महाराजांचे अकरावी वंशज हभप प्रशांत महाराज मोरे यांनी केले. महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, भारत सरकार उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत - लोकोत्सव हा महाराष्ट्र व ओरीसा दोन्ही राज्यातील संस्कृतीचे दर्शन घडविणारा तीन दिवसीय उत्सव साजरा होत आहे. लोकोत्सवाचे संयोजन पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशनने केले असून तीन दिवसीय लोकोत्सवाचे उद्घाटन प्रा.



रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड येथे गुरुवारी (दि.२० मार्च) मोठ्या उत्साहात झाले. पहिल्या दिवशी भक्ती उत्सव, शुक्रवारी आदिवासी संस्कृतीचा आदिवासी कला उत्सव तर शनिवारी (दि. २२ मार्च) लोक संस्कृतीच्या लोकोत्सवाने समारोप होणार आहे. उद्घाटन समारंभास लोकमान्य हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्ण जोशी, महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य संचनालयाचे संदीप बलखंडे, जान्हवी जानकर, ओरीसा सांस्कृतिक विभागाचे हेमंत मेहता, सुनील निमावत, मल्लाप्पा कस्तुरे पंडित कल्याण गायकवाड, पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशनचे मुख्य समन्वयक प्रवीण तुपे आदी उपस्थित होते.राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशन नेहमीच प्रयत्नशील असते. महाराष्ट्र शासनाच्या आणि ओरिसा सांस्कृतिक संचनालयाच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड शहरात लोकोत्सव हा कार्यक्रम म्हणजे पिंपरी चिंचवडकरांना ही सांस्कृतिक मेजवानी आहे, तसेच यापूर्वी देखील पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशन च्या वतीने राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यासाठी असे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते असे पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशन चे मुख्य समन्वयक प्रवीण तुपे यांनी प्रास्ताविकात सांगितले.डॉक्टर देहाचे विकार दूर करतो तर कलाकार मानसिक विकार दूर करतो. त्यामुळे भक्ती उत्सव हा सर्वांना मानसिक ऊर्जा देणारा आहे, असे डॉ. श्रीकृष्ण जोशी म्हणाले. पं. कल्याण गायकवाड यांनी श्रीराम भजनाने भक्ती उत्सवाला प्रारंभ केला. त्यानंतर कार्तिकीने इंद्रायणी काठी देवाची आळंदी, घागर घेऊन... घागर घेऊन.. निघाली आदी रचना सादर केल्या. कौस्तुभ गायकवाड अवघे गरजे पंढरपुर चालला नामाचा गजर हे भजन सादर केले. हभप अभय नलगे यांनी सूत्रसंचालन केले. पं. कल्याण गायकवाड, कार्तिकी गायकवाड, कौस्तुभ गायकवाड यांनी भजन, कीर्तन, भारुड सादर करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर ओरिसा राज्यातील कलाकारांनी सादर केलेल्या बहारदार नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय बोत्रे, आभार अनिल गालिंदे यांनी




# 05 लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या 14 मालमत्ता केल्या जप्त

## मालमत्ता कर वसुलीसाठी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील 'ऑन ग्राऊंड'...

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ता कर वसुलीसाठी धडक मोहीम हाती घेतली आहे. महानगरपालिका प्रशासनाने आता थकबाकीदारांच्या पाच लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे. ही जप्ती मोहिमेमध्ये महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारीही सहभागी होत आहेत. गुरुवार (20 मार्च) रोजी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी थेट महानगरपालिका कार्यक्षेत्रात चिखली, तळवडे, आकुर्डी, वाकड झोनमधील मिश्र, बिगनिवासी, व्यावसायिक थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्या असून निवासी मालमत्ता कर थकबाकीदारांच्या मालमत्तांचे नळ कनेक्शन तोडणीची कारवाई करण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन व आकारणी विभागामार्फत मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. मालमत्ता कर



भरण्यासाठी नागरिकांना सातत्याने आवाहन करण्यात आहे. वारंवार आवाहन करून देखील जे मालमत्ताधारक मालमत्ता कर भरत नाहीत, त्यांना नोटीस देण्यात येत आहेत. त्यानंतरही कर न भरणाऱ्या थकबाकीदारांच्या आता थेट मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठी मालमत्ता कर विभागाची प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात पथके कार्यरत करण्यात आली आहे. त्यातच आता आर्थिक वर्ष 2023-24 संपण्यासाठी अवघे बारा दिवस शिल्लक राहिल्यामुळे आता थेट जप्ती कारवाई करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी ऑन ग्राऊंड दिसू लागले आहेत. गुरुवारी चिखली येथील श्री. संदीप प्रकाश मोरे यांच्या मिश्र मालमत्तेकडे 23,49,५०८ लाख रुपयांची थकबाकी असल्याने मालमत्ता जप्तीची व नळ कनेक्शन तोडणीची कारवाई करण्यात आली. त्याचबरोबर, तळवडे येथील भालेकर नवनाथ तुकाराम व इतर यांच्या इंडिया टूल्स या औद्योगिक मालमत्तेकडील 20 लाख 64 हजार रुपयांच्या थकीत रकमेपोटी मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली. याचबरोबर, बेळळे माधव नागप्पा यांच्या मिश्र मालमत्तेकडील 16 लाख 93 हजार 597 इतक्या रक्कमपोटी, आकुर्डी येथील मे. हॉटेल पन्हाळगड तर्फे विवेक सोपान काळभोर/गोपाळ धों. काळभोर व इतर 2 यांच्याकडील 28,37,203 इतक्या थकीत रकमेपोटी, हॉटेल शेतकरी मळा तर्फे अनिकेत भगवान काळभोर यांच्या 23,38,522 इतक्या थकीत रकमेपोटी, मे. हॉटेल कबाबकरी तर्फे ओंकार अरुण काळभोर यांच्या 10,75,404 इतक्या थकीत रकमेपोटी तर मे. शेतकरी मळा मिसळ हाऊस तर्फे अजिंक्य भगवान काळभोर यांच्या 1,89,846 इतक्या थकीत रकमेपोटी तर वाकड येथील धनाजी रामभाऊ विनोदे यांचे हॉटेल अजिंक्य यांच्याकडील 14,44,९०२ इतक्या थकीत रकमेपोटी मालमत्ता जप्तीची कारवाई करून मालमत्ता सील करण्यात आल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त, सहाय्यक आयुक्त, प्रशासन अधिकारी, सहाय्यक मंडलाधिकारी, गटप्रमुख आदींच्या उपस्थितीत सदर कारवाई करण्यात आली.